# TOPIC NO III

# सामाजिक संस्था

## (Social Institutions)

**-सामाजिक संस्था : अर्थ आणि वैशिष्टे**

**-सामाजिक संस्थांचे महत्व**

**-सामाजिक संस्था आणि त्यांची कार्ये**

**(कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण)**

**प्रस्तावना :**

समाजातील सदस्यांच्या मूलभूत गरजाची पुर्तता करण्यासाठी विविध सामाजिक संस्थाची निर्मिती करण्यात आली आहे. मानवाच्या विविध गरजा उदा. प्रजोत्पादन, बालसंगोपन, उदरनिर्वाह, समूह सदस्यावर नियंत्रण, संस्कृतीचे हस्तांतरण, समाजीकरण, वगैरेंचे निराकरण करण्यासाठी मानव समाजात लोकरुढी, लोकनिती, कायदे या सारखे सामाजिक नियमन तयार झालेले असतात. मानवाने स्वतःच्या गरजा पुर्तीसाठी प्रस्थापित केलेले वर्तन प्रकार किंवा नियम म्हणजे 'सामाजिक संस्था' होय.

सामाजिक नियमनांचा भंग लोक करीत नसतात. केला तर शिक्षा होते. सामाजिक नियमनास समाजाची मान्यता असते. समाजाच्या मुल्यांवरच सामाजिक नियमन आधारलेले असतात. त्यामुळे मूलभूत गरजांची पूर्वता करण्यासाठी सामाजिक मुल्यांची जपणुक करणा-या सामाजिक नियमनानुसार लोकानी वर्तन करावे, असा आग्रह असतो. त्यानुसार समाजात विविध सामाजिक संस्था तयार होतात. सामाजिक संस्थाचे स्वरूप सार्वजनिक आहे. कारण प्रत्येक समाजत संस्था आढळुन येतात. प्राचीन काळापासून कुटुंब, विवाह श्रम, राज्य, आर्थिक इत्यादी संस्था अस्तित्वात आहेत.

**सामाजिक संस्थेची व्याख्या** -

**१) किंग्जले डेव्हिस -**

किंग्जले डेव्हिस यांच्या मते "संस्था म्हणजे एक किंवा अधिक कार्याभोवती रचल्या गेलेल्या लोकरुढी, लोकनिती व कायदे यांची शुंफण होय."

**२) ग्रीन -**

"सामाजिक कार्ये पार पाडण्यासाठी अधिक लोकरुढी, लोकनिती व कायदे यांचे एका घटकात झालेले संघटन म्हणजे 'संस्था' होय.

**३) हॉर्टन आणि हेट :-**

संस्था ही सामाजिक संबधाची अशीही संघटीत व्यवस्था आहे की, ज्या व्यवस्थेत काही समान मुल्य व वर्तन पध्दतीचा समावेश असून ती समाजाच्या काही मुलभूत गरजांची पूर्तता करते.

## सामाजिक संस्थेची वैशिष्ट्ये :-

सामाजिक संस्थाच्या विविध व्याख्यावरून सामाजिक संस्थाची काही प्रमुख वैशिष्ठ्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१. सार्वत्रिकत्ता :-**

सामाजिक सबंधातून सामाजिक संस्था निर्माण होत असल्याने सर्वच प्रकारच्या समाजात सामाजिक संस्था आढळतात. सामाजिक संस्थाशिवाय कोणातही समाज आढळत नाही. आदिवासी, ग्रामीण, शहरी, आशा सर्व समाजात काही मूलभूत उदिदष्टाची पुर्तता विवाह, कुटुंब, धर्म, राज्य या संस्था आढळतात.

**२. निश्चित उद्दिष्टय पूर्तीचे साधन :-**

कोणतेही संस्था मानवाच्या विविध गरजा उद्दिष्टये यांच्या पुर्ततेसाठी मानवानेच निर्माण केलेले साधन आहे. या गरजाची पुर्तता करणे, हे सामाजिक संस्थाचे प्रमुख कार्य आहे. सामाजिक संस्थांच्या मुळाशी असलेले हेतु, विचार, उद्दिष्टये, भावना इत्यादींना विल्यम सम्नर यांनी संस्थेची संकल्पना मानतात. उदा० कुटुंबबसंस्थेच्या मुळाशी प्रजोत्पादन, बालसंगोपन, बालसंवर्धन वगैरे मुलभूत उद्दिष्ट्ये आहेत. या उद्दिष्ट्यांची पुर्तता होण्याच्या दृष्टिने कुटुंब कार्ये करीत राहते.

**३. रचना :**

संस्थेच्या मुळाशी असलेली उद्विष्ठ्ये प्रत्यक्षात पूर्ण होण्यासाठी संस्थेला रचनात्मक स्वरूप प्राप्त झालेलो असते. आशा रचनाशिवाय सामाजिक संस्था आकाराला येत नाही. म्हणुनच विल्यम सम्नर यानी रचना हे सामाजिक संस्थाचे महत्वाचे अंग मानले आहे. रचनमुळे संस्थेशी संबंधित

सभासदांच्या वर्तनांचे नियमन केले जाते. त्याच प्रमाणे त्याना विशिष्ट भूमिका पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. ही रचना अनेक नियमनांची बनलेली असते, म्हणजे यात उद्दिष्टयपुर्ती साठी आवश्यक असलेल्या लोकरुढी, लोकनिति व कायदे यांची गुंफण आढळते. याचे पालन संस्थेच्या सभासदाना करावेच लागते. यामुळे संस्थेतील सभासदाना विशिष्ट्य दर्जे गिळतात. या दर्जानुसार भूमिका पार पाडावी यांचीही जाणीव त्याना करून दिली जाते. प्रजोत्पादन, बाल संगोपन, बाल संवर्धन, या कुटुंबाच्या मूलभूत उद्दिष्ट्या भोवती अनेक लोकरुढी, लोकनिति, कायदे यांची गुंफण तयार होऊन कुटुंब संस्था तयार होते. या गुंफणीला एक विशिष्ट रचना प्राप्त झालेली असते आईचा, वडीलांचा मोठ्या भावाचा, आजोबाचा वगैरे कुटुंबातील व्यक्तीचा दर्जा व त्यांच्या भूमिका यातून निश्चित होतात. संयुक्त कुटुंब, कैंद्र कुटुंब हे मातृसत्ताक कुटुंब, पितृसत्ताक कुटुंब हे कुटुंब हे रचनेचे विविध प्रकार सांगता येतील.

### ४. लिखीत अलिखीत रचना-

संस्थेच्या सदस्यांचे दर्जे कोणते. त्यानी कोणत्या भूमिका पार पाडावयाच्या, त्यांनी कोणते वर्तन प्रकार अवलंबयाचे या बाबत संस्थेला जी रचना प्राप्त झालेली असते. ती लिखति अलिखीत स्वरूपात आढळते. निरक्षर आदिवासी समाजातील संस्था अलिखीत स्वरुपात असतात. विशिष्ट प्रथा परंपरा यांचे ते पालन करतात. परंतु साक्षर/ प्रगत /समाजात काही संस्था या लिखत स्वरुपात आढळतात. कारण असे समाज संकिर्ण असतात. राज्य संस्था मालमत्ता व्यापारी संस्था वगैरे तसेच काही सामाजिक संस्था या अधिक सुसंघटित असण्याची शक्यता असते. संस्थेला सदस्याकडून कोणत्या वर्तनाची वर्तनाची अपेक्षा आहे हे लिखीत रचनेतून स्पष्ट केले जाते. तसेच या वर्तनाचा भंग झाल्यास त्यांच्यावर कोणती उपाययोजना केली आहे हेही यातून स्पष्ट केले जाते. तसेच राज्य घटना, धर्मग्रंथ व्यापारी करार बँकची घटना शिक्षणाचा अभ्यासक्रम परिक्षा पद्धती वगैरे लिखीत स्वरुपातील बाबी राज्य धर्म मालमत्ता शिक्षण इ. सामाजिक संस्थेच्या रचनेशी संबंधित असतात.

### ५. नियंत्रणात्मक स्वरूप :-

विविध सामाजिक संस्था या आपल्या सदस्याकडुन विशिष्ट वर्तनाची अपेक्षा करीत असतात. त्यामुळे सदस्यांच्या वर्तनांचे नियंत्रण होते. एखादा अपवाद सोडला तर या सामाजिक संस्थाना जे नियंत्रणात्मक स्वरुप प्राप्त झालेले असते, त्यामुळे समाज व्यवस्था टिकवणे, संस्कृतीचे संवर्धन करून ती संक्रमीत करणे आशा प्रकारे समाजाचे सातत्य टिकवले जाते यामुळेच सामाजिक संस्थाना समाजाची चाके म्हटले जाते.

### ६. सापेक्षता स्थीर :-

संस्थेची जी उद्दिष्ट्ये असतात त्यांच्या प्राप्तीसाठी व्यक्तीकडून विशिष्ट वर्तनाची

पुर्ती होणे आवश्यक असते. त्यासाठी विशिष्ट सामाजिक नियमनावर आधारित नियमांचे पालन व्यक्ती करते. नियमनांचे असे पालन पिढ्यान पिढ्या होत असते. सहसा यात बदल होत नाही. त्यामुळे सामाजिक संस्थाना एक ताठर स्वरूप आलेले असले. शिवाय बदल झाला तरी नियम हे राहतात त्यांना सविक्षता प्राप्त झालेली असते.

**७. प्रातिकांचा वापर :-**

सामाजिक संस्था जसजशा विकसीत होत जाऊन त्याना संघटीत स्वरूप प्राप्त होते तसतसे त्यांना प्रतिके लाभतात. ही प्रतिके भौतिक किंवा अभौतिक असतात. तसेच त्या संस्थेशी सबंधित असतात व संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. उदा. मंगळसूत्र किंवा भांगातील कुंकू ही प्रतिके हिंदुच्या विवाह संस्थेची जाणीव करून देतात. तर क्रॉसची सून ख्रिश्चन धर्मसंस्थेचे प्रतिनित्व करते. 786 ही संख्या इस्लाम धर्मसंस्थेची जाणीव करते. मुलांचा गणवेश शिक्षण संस्थेची जाणीव निर्माण करते, अशी अनेक प्रतिके समाजात असतात. आशा प्रतिकामुळे संस्थेयी सबंधित मूल्ये, भावना, योगा - योग्यतेच्या कल्पना, पवित्र-अपवित्रतेच्या कल्पनाचा परिचय होतो.

**८. उपयुक्त साधनाचा वापर :-**

ज्या विशिष्ट गरजा उद्दिष्ट्याची पुर्तता संस्थेला करावयाची असते, त्यासाठी केवळ सामाजिक नियमन पुरेशी नसतात, तर कितीतरी उपयुक्त साधने आवश्यक असतात. धर्म संस्थेच्या संदर्भात मंदिरे मशिदी, चर्च, मठ, या इमारती, तर कुटुंब संस्थेच्या संदर्भात घर, घरातील भांडीकुंडी, व इतर वस्तु ही अत्यंत उपयुक्त साधन आहेते, शाळेची इमारते, बाक, खडू, फळा, ग्रंथ, प्रयोगशाळा, वगैरे शिक्षण संस्थेशी संबंधित साधने आहेत. याशिवाय संस्थाना त्यांची उद्दिष्ट्य पूर्ण करता येणार नाहित.

**९. संस्थाचे परस्पर-पुरकत्व :-**

सर्वच समाजात विशिष्ट उदिदष्ट्यांची पुर्तता करण्यासाठी, विविध संस्था, विकसीत झालेल्या असतात. पण याचा अर्थ असा नव्हे की एका संस्थेचा दुसऱ्या संस्थेशी संबंध नसतो. उलट त्या संस्था एकमेकास परस्पर पुरक अशीच कार्ये पार पाडतात.

उदा. समाजीकरणाची प्रक्रिया कुटुंबातून जशी होते. तशीच शैक्षणिक संस्थेतून होते. व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण राज्य-संख्या करते. तसेच कुटुंब विवाह व धर्म संस्था देखील करते. म्हणजे विविध संस्थाकडुन वेगवेगळी कार्ये केली जात असली तरी ती परस्पर संबंधित असतात.

# अ) कुटूंबसंस्था

पुरातन काळापासून ते आज तागायत च्या कोणत्याही मानवसमजाचा मानवसमाजाचा मुलभुत घटक कुटुंब संस्था आहे. समाज हा अनेक कुटुंबे मिळून तयार होतो. व्यक्ती व समाज यातील दुवा कुटूंब संस्थाच होय. त्यामुळे कोणत्याही समाज व्यवस्थाचा अभ्यास करताना त्यातील कुटुंब संस्थेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. कोणत्याही व्यक्तीला समाजात कोणत्या तरी कुटुंबाचा सदस्य म्हणून ओळखले जाते .

कुटुंब म्हणताच आपले स्वतःचे कुटूंब, शेजा-याचे कुटुंब, मित्राचे कुटुंब असे चित्र आपल्या समोर येते.

**कुटूंबाची व्याख्या :**

विविध सामाज शास्त्राज्ञानी कुटूंबाच्या व्याख्या दिलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे :

**१) मॅक आयव्हर पेज :**

"प्रजोत्पादन, बालसंगोपन व संवर्धन करण्यासाठी पुरेसा लहान व कायम स्वरूपाच्या लैंगिक संबंधावर आधारलेला समूह म्हणजेच कुटूंब होय" .

**२) डॉ .डी .एन मजुमदार :**

"एकाच घरात राहणा-या एकमेकांशी रक्त संबंधित असणा-या, स्थान हित व कर्तव्याची जाणीव या बद्दल जागृत असणा-या व्यक्तीच्या समुहाला कुटूंब म्हणतात".

**३) रॉबर्ट लुई :**

“कुटुंब हा विवाह संबंधावर आधारलेला सामाजिक समूह आहे या समूहात माता पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो".

**४) किंबाल यंग :**

"ज्या समुहात एक किंवा अधिक पुरूष आपल्या एक किंवा अधिक स्त्रिया आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलासंहित मुले लहान असे तो पर्यंत एकाच घरी राहतात असा समुहाला कुटुंब म्हणतात".

वरील व्याख्यावरून असे लक्षात येते की, कुटूंब हा विवाहाच्या मार्गाने लैगिंक संबंधावावत समाज मान्यता मिळवलेला भिन्न लिंगी व्यक्ती व त्यांचा मुलांचा, दिर्घकाळ एकाच घरात वास्तव्य करणा-या व्यक्तीचा समुह होय, संतती निर्माण करून त्यांचे संगोपन, संवर्धन करून समाजाचे सातत्य राखण्याचे कार्य करावे .त्या अनुषगांने येणा-या सामाजिक, आर्थिक जवावदा-या पार पाडाव्यात अशीच समाजाची दृढ धारणा कुटूंबा पाठी मागे असते.

## १) कुटूंब संस्थेची वैशिष्टये :

कुटूंब संस्थेची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

**१) विवाह बंधनातुन निर्मिती :**

भिन्नलिंगी व्यक्तींच्या एकत्र येण्याला विवाहाची गरज असते. या विवाहातुन कुटूंबाची निर्मिती होते . विवाह बंधनाला समाज मान्यता असते. विवाह बंधन हे दिर्घकाळ टिकणारे, कायमचे अगर अल्पजीवी असते .पती पत्नी या दोहोंपैकी एकाच्या मृत्युने किंवा हेतु पुरसर घेतलेल्या घटस्फोटानी संपते.

**२) रक्त संबंधिताचा समुह :**

आई वडील व त्यांची मुले आणि आई वडीलांचे इतर आप्त यांचा देखील कुटूंबात समावेश होतो हे सर्वच सदस्य रक्त संबंधित असतात मात्र दत्तक घेतलेली मुले अगर सावत्र आई ,बाप,भाऊ,बहिण, मुले याच्यांत रक्तसंबंध व विवाह संबंध नसले तरी समाजाकडून त्यांना मान्यत मिळालेली असते त्यामुळे त्यांची गणना रक्त संबंधितांतच होते .

**३) द्विपक्षीय स्वरूपाचा समुह :**

विवाह बंधनाने पती पत्नी एकत्र येतात. दोघेही दोन वेगवेगळया कुटूंबाची म्हणजे दोन पक्षाची असतात .त्यांना मुले झाल्यावर त्या मुलांचा आई वडीलांच्या इतर नातेवाईकांशी संबंध प्रस्थापित होतो .मुलांना आईकडून आजी आजोबा मिळतात त्याच प्रमाणे वडीलांच्या कडून देखील आजी आजोबा मिळतात. आईकून मावशी, मामा हे नातेवाईक लाभतात त्याच बरोबर आत्या, काका हे वडीलांकडून

लाभतात. या विशिष्ट नातेवाईकाना विशिष्ट कामे कुटुंबात दिलेली असतात . यामुळे कुटुंवाला द्विपक्षीय आप्तांचा समुह म्हटले जाते.

**४) समान निवास स्थान :**

कुटुंबातील सर्व सदस्यांचे निवास स्थान एकच असते त्यामुळेच त्यांना परस्पराविषयी कार्ये पार पाडता येतात केवळ अपवादात्मक पणे म्हणजेकुटुंब बहू विवाही पध्दतीचे असेल अगर व्यवसायासाठी काही सदस्य दुर राहत असतील तरच निवास स्थान समान नसते .

**५) माता अगर पित्या मार्फत वंशपरंपरा निश्चिती :**

माता पिता हे दोघे ही अपत्यांशी रक्तसंबंधीत असले तरी समाज व्यवस्थेच्या अनेक सोयी साठी अपत्यांची वंशपरंपरा माता अगर पितृसत्ताक कुटुंब रूढ असलेल्या समाजात मुलाला अगर पदाचा उत्तराधिकार म्हणजे वारसा मिळतो. याच्या उलट मातृसत्ताक कुटुंब पध्दतीत आई मुलांची वंश परंपरा निश्चित केली जाते व मालमत्तेचा व पदाचा वारसा आईकडून मुलीला मिळतो.

**६) आर्थिक घटक :**

कुटुंबातील सदस्यांच्या उदरनिर्वाहाची पालन पोषणाची जबाबदारी कुटूंबाचीच असते कुटूंब प्रमुख कुटूंबातील सदस्याच्या सहाय्याने कुटूंबाच्या आर्थिक गरजांचे निराकरण करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. कुटूंबातील सदस्यांचा एखादा समान व्यवसाय असतो अगर वेगळया ठिकाणी काम करीत असले तरी कुटूंबासाठीच अर्थाजन असते. प्रत्येक कुटूंबाची काही ना काही मालमत्ता असते त्याचप्रमाणे ही मालमत्ता कुटूंबातच राहत असते . त्यामुळे समाजाची अर्थोत्पादनाची जी व्यवस्था असते त्यात कुटूंब हा स्वतंत्र आर्थिक घटक असतो .

मॅक आयव्हर व पेज यांनी कुटूंबाची इतर समुहांशी तुलना करून कुटूंबाची पुढील वैशिष्टये सांगितलेली आहेत.

**७) सार्वत्रिकता :**

प्राचीन काळातील समाजापासून आजतागायत जगातील सर्व प्रकारच्या समाजात कोणत्या ना कोणत्या प्रकारात कुटुंब पध्दती आढळतेच एवढेच नव्हे तर भविष्यात देखील कुटूंब पध्दती आढळेलच असा समाजशास्त्रज्ञांचा दावा आहे.

**८) भावनात्मक पाया :**

इतर कोणत्याही समुहापेक्षा कुटुंब संस्थेत आढळून येणारे भावनीक संबंध व प्रजोत्पादना बरोबर मातृ -पितृ भावना, परस्पराबद्दलचे वात्सल्य इ. भावनांचा अविष्कार कुटुंबात पहायला मिळतो. यातुन परस्पराबद्दल कर्तव्य भावना, मालमत्तेची इच्छा वंशाभिमान वंश सातत्याच्या तीव्र भावना

निर्माण होतात आपण सर्वजन एकआहोत ही भावना सदस्यात भिनलेली असते. त्यामुळे कुटुंबात स्थैर्य प्राप्त होते.

**९) व्यक्तीसाठी अग्रक्रमांकाचा समुह :**

व्यक्तीचा कितीतरी समुहांशी संबंध असतो. पण व्यक्ती जन्मतेच कुटूंबात त्यांचे पालन पोषण,संवर्धन याच वरोवर त्यांचे व्यक्तीमत्व घडण्यात कुटूंबाचा वाटा अत्यंत महत्वाचा असतो . व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीचा पाया कुटूंबात घातला जातो .

**१०) मर्यादित आकार :**

कुटूंबाला आपण जैविक घटक देखील म्हणतो कुटूंबातील सर्व सदस्य रक्तसंबंधित असतात त्यामुळे जीवशास्त्रीय परिस्थिती मुळे आपोआपच कुटूंबाच्या आकारावर मर्यादा पडतात. आपणास कुटूंबातील व्यक्ती कितीही हव्या असल्या तरी त्या अमर नसतात. वृध्दापकाळ, आजारपण, अमर अन्य मार्गाने त्या कुटूंबातुन कमी होतात जननक्षमता देखील मर्यादित असते. त्यामुळे कुटूंबाचा आकार मर्यादित राहतो .

**११) सामाजिक नियनम :**

व्यक्तीवर नियंत्रण कुटूंबाचे असते. कुटूंबाचे नियंत्रण झुगारणे व्यक्तीला सोपे वाटत नाही . रूढी, परंपरा, लोकांवर यांच्याव्दारा व्यक्तीच्या समाज वर्तनावर मर्यादा / नियंत्रण प्रस्थापित . केले जाते. कुटूंबाचे व्यक्ती वरील नियंत्रण हे सर्वश्रेष्ठ मानले जाते .

# कुटूंबाची कार्ये

समाजाचे अस्तित्व टिकण्यासाठी कुटूंबाला विविध कार्ये करावी लागतात.ही कार्ये विविध आणि मुलभुत स्वरूपाची असून अन्य सामाजिक संस्था त्यावर अवलंबून असतात त्यामुळेच कुटूंबास समाजरचनेचा पाया म्हटले जाते.

## १) जैविक कार्ये

**अ) समाज मान्य मार्गाने कामपुर्ती :**

कुटूंब हे विवाहीत व्यक्तींच्यातील लैगिंक संबंधांना टिकाऊ स्वरूप देते . त्यामुळे एकीकडे समाज मान्य मार्गाने काम या सहज प्रवृत्तीची पुर्तता होते व दुसरीकडे समाजातील

काम प्रवृत्तीचे नियमन होते.

**ब) प्रजोत्पादन :**

कितीतरी समाजातून विवाहाचे उद्‌दिष्ट्ये संतती मानले जाते. जेव्हा कुटुंबातून प्रजोत्पादन होते त्यामुळे मानव समाजाचे सातत्य राखले जाते.

**क) बालसंगोपन संवर्धन व शरीर संरक्षण :**

इतर कोणत्याही पाण्याच्या तुलनेत मानवाच्या जन्मानंतर परावलंबनाचा काळ मोटा असतो. त्यामुळे नवजात अर्वकाचे फार दिर्घकाळ पर्यंत इतरांनाच पालन पोषण करावे लागते. बालकांचे संगोपण व संबंधन कार्य कुटुंबच चांगल्याप्रकारे पार पाडते. कुटूंवा बाहेर मुलाचा योग्य प्रकारे व्यक्ती विकास होऊ शकत नाही. शरीर संरक्षणाची इतर सदस्यांना गरज भासते. बाळंतीन, वृध्द, अपंग, आजारी यांच्या संरक्षणाची जवाबदारी कुटूंब पार पाडते त्याच बरोबर कुटूंबातील सदस्यांवर कोणी हात उगारला तर कुटूंबातील सदस्य धावून जातात.

## २) मानसिक कार्ये :

पती पत्नी यांचे संबंध केवळ शारिरीक स्वरूपाचे असतात असे नाही तर त्यांच्यांत परस्पराविषयी आत्मियता, प्रेम, सहानुभुती असते. याच उदात्त भावनांचा अविष्कार ते त्यांच्या अपत्यांवर करतात . . भावनिक सुरक्षा ही व्यक्तीची एक महात्याची मानसीक गरज आहे. त्यांची पुर्तता जेवढी कुटूंबात होते तेवढी कोणत्याही अन्य समूहात होत नाही. विशेषता नवजात अर्भकांचे जेव्हा कुटूंबातून मानवीकरण होत असते तेव्हा ही सुरक्षितता अत्यंत आवश्यक असते. व्यक्ती महत्वाचे विकसन ही मानसिक प्रक्रिया आहे. यात कुटूंबाची भूमिका महत्वाची असते. कुटूंबातील व्यक्ती पररपरांच्या सुख दुखात इतक्या सहभागी होतात की त्यामुळे एकमेकांच्या व्यक्तीमत्वावर फार मोटा प्रभाव पडतो.

## ३) सामाजिक कार्ये :

कितीतरी सामाजिक कार्ये कुटूंबाकडून पार पाडली जातात .

**अ) सामाजिक दर्जा :**

व्यक्तीला समाजात स्थान मिळते व कुटूंबा मार्फतच कुटूंबाची जान, धर्म, समाजातील स्थान यानुसार व्यक्तीला समाजात दर्जा मिळतो.

**ब) समाजीकरण :**

कुटूंब ही व्यक्तीची समाजशिक्षण देणारी मोठी शाळा समजली जाते. व्यक्तीला ती नवजात अर्भक असल्यापासून अनेक प्रकारचे शिक्षण बनवण्याची पात्रता प्रामुख्याने कुटूंबाकडून

मिळते. कुटूंबातील सदस्यातील परस्पर संबंधातुन ही समाजीकरणाची क्रिया घडत असते.

**क) सामाजिक नियंत्रण :**

आर्थिक, धार्मिक,राजकीय वगैरे कोणत्याही क्षेत्रात समाज संमत वर्तवणकि होईल असेच शिक्षण पहिल्यापासून कुटूंबाकडून व्यक्तीला मिळत असते. एवढेच नव्हे तर व्यक्तीकडून समाज बाहय वर्तवणुक झाल्यास कुटूंब सदस्याला अनौपचारिक शिक्षा मिळते . त्यामुळे आपोआपच व्यक्तीच्या वर्तणकिीचे नियंत्रण होते .

**ड) संस्कृती संरक्षण व संक्रमण :**

कुटूंबातील सदस्यांचे आचार विचार त्या समाजाच्या संस्कृतीनुसार असतात . एवढेच नव्हे तर या संस्कृतीचा ठेवा व अभिमानाने जपत असतात व नवजात अर्भकाला संस्कृतीचे शिक्षण देतात . त्यामुळे एकीकडे संस्कृतीचे संरक्षण करीत असताना त्या संस्कृतीचे एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संक्रमण करण्याचे कार्ये कुटूंब करीत असते .

**इ) सामाजिक संरक्षण :**

कुटूंबातील सदस्यांचा अपमान कोणी करू नये, शिव्या देऊ नयेत, एखादे संकट येऊन त्यांची अब्रु जाऊ नये .याची काळजी कुटूंबाकडून घेतली जाते. त्यासाठी व्यक्तीच्या मदतीला धावून जावून सामाजिक संरक्षण देण्याचे कार्ये कुटुंब करते.

## ४) आर्थिक कार्ये :

कुटूंबातील सदस्यांच्या मुलभुत गरजांचे निराकरण करून कुटूंबाला आर्थिक स्थैर्य देण्यात कुटूंव सतत प्रयत्नशील असते. कुटूंब प्रमुखाच्या नेतृत्वाखाली इतर सदस्य आर्थिक क्रियांत सहभागी होत असतात . कुटूंबातील सदस्यांच्यात त्यांचे वय लिंग व इतर पात्रता लक्षात घेऊन श्रम विभागणी केली जाते. कुटूंबाची स्वतःची जमीन, घर, दुकान असी मालमत्ता असते . कोणत्या ना कोणत्या व्यवसायाच्या मार्गाने कुटूंब सदस्य अर्थोत्पादन करीत असतात अर्थोत्पादनासाठी कुटुंबात व्यावसायिक शिक्षण दिले जाते.

## ५) धार्मिक कार्ये :

प्रत्येक कुटूंबाच्या काही धर्मश्रध्दा असतात. त्यानुसार कुटूंब पुजा-अर्चा, होमहवन, उत्सव - समारंभ, व्रत वैकल्य सामुदायिक पण करीत असते. यामुळे कुटूंबाकडून धर्माचरण हे सक्तीचे मानले जाते. कुटूंबाकडून व्यक्तीच्या जन्मापासून मृत्युपर्यंत विविध संस्कार केले जातात.

### ६) करमणुकीचे कार्ये :

व्यक्तीच्या आयुष्याचा मोठा भाग कुटूंबातच व्यतीत होत असतो असा वेळी तिचे मनोरंजन होणे ही देखील महत्वाची गरज आहे. विशेषता ग्रामीण समुदायातुन आदिवासी समाजातुन ही कार्ये कुटूंबालाच पार पाडावी लागतात. गोष्टी सांगणे, गाणी म्हणणे, नृत्यवादन करणे, कोडी घालणे,खेळणे वगैरे सारख्या मार्गानी कुटूंबातील सदस्य परस्परांची करमणुक करतात .

## ब) धर्मसंस्था

धर्माचे मानवी जीवनातील स्थान व महत्व अन्यन साधारण आहे. जन्मापासून ते मृत्युपर्यंत त्याच्या जीवनावर धर्माचा प्रभाव आहे. अन्य कोणत्याही संस्था ही म्हणजे विवाह कायदा, न्याय कुटूंव, जातीसंस्था, मालमत्ता, कला वगैरे सर्वांना धर्माने प्रभावित केले आहे .त्यामुळे धर्माचा समाज शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी धर्माचे समाजशास्त्र (Sociology of Religion) ही वेगळीच शाखा विकसीत झाली आहे.

धर्म ही सार्वत्रिक व महत्वाची सामाजिक संस्था असली तरी तिचे स्वरूप समजावून घेणे तसे सोपे नाही . कारण मुळातच धर्मही भावना, श्रध्दांशी संबंधित बाब आहे. वेगवेगळया समाजातील वेगवेगळया धार्मिक श्रध्दा आहेत. ख्रिश्चन धर्मात ईश्वराशी जोडणे अगर बांधणे या अर्थाच्या Relegare या लॅटिन शब्दावरून Religion हा शब्द रूढ झाला आहे तर हिंदु धर्माला अभिपत असलेली धर्माची संकल्पना व्यापक आहे. धर्म या शब्दाची उत्पत्ती 'धृ धारति इति धर्म ' म्हणजे ज्या (नियम, वर्तणुक, श्रध्दा, दृष्टिकोन इत्यादी. योगे समाजाची धारणा होते तो धर्म होय .

### धर्माची व्याख्या :

जगातील सर्व समाजात धर्म आहे पण सर्व समाजातील धर्माचे स्वरूप सारखे नाही धर्म या संकल्पनेत विभिन्न अशा श्रध्दांचा, विधीचा मुल्यांचा आचार-विचारांचा समावेश केलेला आढळतो तथापी अनेक विध्दानानी धर्माची व्याख्या केलेली आहे.

**१) ऑग्बर्नच्या मते :**

अलौकिक शक्तीबाबतची अभिवृत्ती म्हणजे धर्म होय . "

**२) एडवर्ड टायलर च्या मते :**

धर्म म्हणजे दिव्य प्राण्यावरील श्रध्दा होय."

**३) पी .गिसबर्ट :**

धर्म म्हणजे मानवाचे अलौकिक प्राण्याशी असलेले संबंध व त्यावरील अवलंबन होय."

**४) एमिल डरखिम :**

"धर्म म्हणजे पवित्र वस्तुशी संबंधीत श्रध्दा व आचार विधीचे संघटन चर्चा सारख्या नैतिक समुहात होते . "

## धर्माबाबतच्या मुलभुत बाबी :

कोणत्याही धर्म संस्थे बाबतच्या काही मूलभुत बाबी पुढील प्रमाणे :

### १) सार्वत्रिकता :

समाज मग तो प्राचीन असो, अर्वाचीन असो, वा अत्यंत प्राथमिक अवस्थेतील असो, लोकशाही शासन पध्दतीचा असो, वा साम्य वादी पध्दतीचा असो, तेथे धर्मसंस्था आढळतेच .

### २) अलौकिक शक्तींच्या अस्तित्वावरील श्रध्दा :

धर्म ही श्रध्देची बाब आहे व श्रध्दा ही धर्माचा आधार आहे . अलौकिक शक्ती ही असाधारण अदि अंत नसलेली सर्वत्र संचार करणारी व अमानवी सामर्थ्य असलेली आहे. मानवी जीवन व निसर्ग आत्मा सर्वत्र अस्तित्वात आहे. व तसेच मानवी जीवनाचे व निसर्गाचे नियंत्रण करतो. या विचारांची

यांचे सर्व नियंत्रण या शक्तीच्या हातात आहे असी प्रत्येक धार्मिक व्यक्तीची नितांत श्रध्दा

आहे. अर्थात समाज व संस्कृती यानुरूप या श्रध्दांत मात्र फरक आढळतो. 'अविनाशी स्वरूपाचा आत्मा सर्वत्र अस्तित्वात आहे. व तसेच मानवी जीवनाचे व निसर्गाचे नियंत्रण करतो. या विचारांची सर्वात्मवादी (Animism) ची संकल्पना आदिवासीत आहे. त्या आदिवासीत आत्माला प्रतात्मा, पिशाच्य, भुत, देव वगैरे म्हटले जाते. वनस्पती, पशु, पक्षी व निसर्गातील इतर बाबी यात आत्माचे वास्तव्य असते. असे ही या श्रध्दांत म्हटले जाते. मॅक्स मुल्लरने सर्व चेतन व अचेतन वस्तुतः या दिव्यशक्तीचे अस्तित्व मानणा-या आदिवाशीच्या धर्मश्रध्देला शक्तीवादाचे नांव देऊन त्यांचे विवेचन

केले आहे. या शक्तीच्या अस्तित्वांना मानव व भोवतालचे जीवन निर्धारीत होते. या शक्तीलाच "माना किंवा बोग्गो" म्हटले जाते. मॅक्स मुल्लरने भोवतालचे निसर्गाधिन मानवी जीवन असते आणि त्या निसर्गाचाच प्रभाव पडून निसर्गवादाची संकल्पना Naturalism ची संकल्पना मांडली . भोवतालच्या निसर्गातील सुर्य, चंद्र, आकाश, पाऊस, नदी, जंगल, डोंगर इत्यादींना ती आपला देव मानू लागला .

समाज जसजसा मोठा प्रगत होत जातो तसतशी ईश्वरा बद्दलची श्रध्दा ही गुंतागुंतीची होत जाते.या श्रध्दांचे विवेचन करण्यासाठी धार्मिक ग्रंथ देखील लिहले जातात. आदिवासीपेक्षा प्रगत समाजातील लोकांच्या धर्मव्यवस्थेत श्रध्देचे तात्विक विवेचन सखोल प्रमाणात केलेले असते प्रत्येक धर्माच्या व्यवस्थेत त्यांच्या श्रध्देला सुसंघटित स्वरूप दिलेले असते . या नुसार काही धर्म एकेश्वरवादी म्हणजेच एकच ईश्वर आहे असे मानणारे आहेत उदा. ख्रिश्चन म काही धर्मात वहुदेवतांवादी म्हणजे ईश्वराची अनेक रूपे आहेत व तो अनेक रूपात अस्तित्वात आहे असाही श्रध्दा असते . उदा . हिंदु धर्म,सर्वात्मवादावर विश्वास, श्रध्दा ठेवणारे आदिवासी वगैरे तसेच काहीच्या मते ई श्वर हा निर्गुण निराकर असून त्यांचे सर्वत्र अस्तित्व आहे असी दृढ श्रध्दा असते .उदा . ख्रिश्चन, इस्लाम तर हिंदु धर्मात ईश्वर हा जसा निगुर्ण निराकार आहे तसाच सगुण व साकार ही आहे असी ही श्रध्दा मानली जाते.

## ३) श्रध्देनुसार आचार विधी :

धर्मातील अलौकिक शक्ती वा प्राणी म्हणजे ईश्वरा बद्दल जी श्रध्दा असते . त्याच्याशी सुसंगत अशा आचार विधींचा अवलंब धर्मातील व्यक्तीला करावा लागतो कारण या अलौकिक शक्तीला शरण जाऊन तिला प्रसन्न करून घेतल्याने आपणास सुख,समृध्दी, स्वास्थ लाभेल व दुःख,दारिद्रय, आजार, अपघात, संकट इ. वर मात करता येईल असी ही त्यांची श्रध्दा असते . त्यामुळे प्रत्येक धर्मात व्यक्तीने ईश्वर विषयक किंवा पवित्र वस्तुविषयक कोणते वर्तन करावे . इतरांशी कसे वागावे या विषयी आचार विधी आढळतात. यात देवाची पुजा, प्रार्थना, स्तवन, दानधर्म,वळी, उपवास, व्रतवैकल्य ठरविक प्रकारच्या अन्नाचे सेवन काही अन्नाचा त्याग इ. बाबींचा समावेश होतो. ईश्वर विषयक जी श्रध्दा असते त्या प्रती अभि व्यक्तीचा अविष्कार अशा आचार विधीतुन होतो असे वर्तन पवित्र समजले जाते. काही वेळा एकत्रीत पणे हे आचारविधी करण्यावर समाज भर देत असतो. त्यामुळे ईश्वरावर अधिक चांगला प्रभाव पडतो असे त्याला वाटते पण त्याच बरोबर त्या समूहातील लोकांत एकतेची भावना वाढीस लागते आचार विधीच्या फरकावरूनच दोन धर्माचे स्वरूप स्पष्ट करता येते.

## ४) पवित्र - अपवित्र, अलौकिक -लौकिक भेद :

धर्मामुळे काही वस्तुवर्तन यांना पवित्र अलौकिक मानले जाते. तर काही वस्तु वर्तनाना अपवित्र -लौकिक मानले जाते. धर्मपवित्र वस्तु व वर्तन यांचा स्विकार करावयास लावतो . याप्रमाणे व्यक्तिने वा समुहाने केलेली वर्तवणुक धार्मिक समजली जाते यामुळे पुण्य संपादन होऊन त्याला मृत्युनंतर सदगती मिळते तो स्वर्गात जातो, स्वर्गाला ख्रिश्चन 'हैवन' म्हणतात तर इस्लाम धर्मिय 'जन्नत' म्हणतात .या उलट अपवित्र वर्तवणुक हे पापाचरण असून ते अधार्मिक आहे या बद्दल समाज त्यांची

निंदा करतो शिक्षा करतो. एवढेच नव्हे तर मृत्युनंतर त्याला नरकात (हिंदु) हेल मध्ये (ख्रिश्चन) जहन्नम मध्ये (इस्लाम) यातनामय जीवन जगावे लागते .

### ५) प्रतिकात्मक उपयुक्त सांस्कृतिक लक्षणे :

धर्माचे जाणीवपुर्वक प्रतिनिधीत्व करण्यासाठी धर्माचरणाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक धर्मात काही प्रतिकात्मक, सांस्कृतिक लक्षणे दिसून येतात . ताईत,क्रॉस,ओम ,स्वस्तीक,७८६ ही संख्या वगैरे विविध धर्माची सांस्कृतिक लक्षणे आहेत . त्याचप्रमाणे धर्मानुसार आचार विधी पार पाडण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरूद्वार पुजेचे साहित्य, धर्मग्रंथ वगैरे उपयुक्त सांस्कृतिक लक्षणे संबंधित धर्मात दिसून येतात. आदिवासीच्या समाजात देखील कुलचिन्हांना असेच स्वरूप प्राप्त झालेले असते.

### ६) आचार विधीसाठी खास प्रशिक्षित लोकांचा वर्ग :

प्रत्येक धर्मातील धर्मविधी पार पाडले तरच अलौकिक शक्ती प्रसन्न होणार या स्तव पुरोहित,पुजारी,प्रिस्ट,मुल्ला, मौलवी, भगत, मांत्रिक धर्माचे आकलन करून घेतले आहे. व धर्म च विधी वाबत मार्गदर्शन करण्याचा अधिकार त्यांना असे आहे असी लोकांची दृढ भावना झालेली असते . त्यांनी धर्माचे समग्र आकलन करून घेतले आहे.

### धर्माची कार्ये :

रॅडक्लिफ बाऊन मॅलिनोस्की व एग्मिल डरखीम यांनी याबाबत धर्माचे कार्यवाही दृष्टिकोनातुन विवेचन केले आहे. व्यक्ती व समाज या दोहोंसाठी धर्म काही उपयुक्त कार्ये करतो.

### १) भोवतालच्या परिस्थितीशी समायोजन :

मानवी जीवनात अनिश्चितता निर्माण व असुरक्षिततेची भावना वळावण्याचे कारण म्हणजे त्याला तो ज्या परिस्थितीत राहत आहे त्यांचे ज्ञान नसते. धर्म आपल्या परिने भोवतालच्या अनाकलनीय अतय परिस्थितीचे ज्ञान व माहिती मानवाला देऊन त्या परिस्थितीशी मानवाचे सुसंगतपणे समायोजन साधतो. त्यामुळे त्याच्या मनातील असुरक्षिततेची भावना कमीहोते . अमुक एका शक्तीमुळे, अमुक गोष्टी घडतात. या श्रध्देमुळे तो निश्चित होता यामुळे त्याच्या मनावरचा ताण

कमी होतो. विज्ञानाचा विकास झालेला नव्हता. त्या वेळच्या समाजात धर्मामुळे भोवतालच्या परिस्थितीशी मानव समायोजन साधून निश्चितपणे जगत आला आहे.

## २) मनः शांती व व्यक्तीमत्वाचे संघटन टिकवणे :

मानवी जीवन हे अनिश्चित, अनाकलनीय घटनांनी भरलेले आहे. त्यामुळे मानवाच्या सर्व इच्छा आकांक्षा पुर्ण होतीलच असे नाही. यश, समृध्दी, प्रतिष्ठा, सुख - स्वास्थ नेहमीच एखादयाच्या वाटयाला येईलच असे नाही. अपघात, दुःख , दारिद्रय वगैरे असलेल्या गोष्टी वाटयाला येतात . वंचना,अपेक्षा,भंग याही गोष्टीना तोंड दयावे लागते. वृध्दत्व,मृत्यु याही घटनांना सामोरे जावे लागते . आजारपण, अपघात, अपेक्षा भंग, मृत्यु इ. चे समर्थन व त्या बाबतचे सांत्वन धर्माने होते ऐहिक जीवनात दु : खापासून सुटका नाही. दुःख सोसलेच पाहिजे असी मनो भुमिका एकीकडे धर्मानेहोत असताना पारमार्थिक जगतातील अतिम उद्दिष्तये महत्वाची आहेत. तरी गाठण्याचे मनोवल धर्म देतो. त्यामुळे कितीही संकटे आली तर व्यक्तीच्या मनाचा तोल जात नाही. तिच्या व्यक्तीमत्वाचे विघटन टाळण्यास धर्म सहाय्यभूत होतो. निराश, विफल व्यक्ती समाज विरोधी वर्तन करण्याचा दाट धोका असतो तो धर्माने टाळला जातो. धर्माचा आधार श्रध्दा आहे या श्रध्देमुळे मानवाल मनःशांती मिळवून देण्याचे व त्यांच्या व्यक्तीमत्वाचे संघटन टिकुन राहण्यास मदत होते .

## ३) जीवन मूल्यांचे संरक्षण :

प्रत्येक समाजाची उभारणी काही जीवन मुल्यांवर झालेली असते ही मुल्ये त्या समाजाच्या संस्कृतीचा मुख्य भाग असतात. या मुल्यांतुनच त्या समाजात काही नैतिक कल्पना रूढ झालेल्या असतात . त्यानुसार व्यक्तीने, समुहाने, वागणे चांगले - वाईट ठरत असते म्हणजे नैतिक कल्पनावर त्या समाजात विशिष्ट वर्तन प्रकार रूढ झालेले असतात. त्यांना धर्माचा पाठिंबा मिळाल्याने त्या वर्तन प्रकाराबद्दल लोकांच्या मनात आदर युक्त भिंती निर्माण होत . शासन यंत्रणा, कायदा वगैरे मुळे लोक या मुल्यांचे पालन करतात पण धर्माचा पाठिंबा असलेल्या मुल्यांचे पालन प्रभावीपणे होते व सामाजिक संघटन टिकून राहण्यास मदत होते. तेव्हा जीवन मुल्ये निश्चित करून लोकांचे वर्तन त्यांचेशी सुसंगतपणे घडवून आणणे व समाजाचे संघटन टिकवणे हे धर्माचे महत्वाचे कार्य आहे असी जीवनमुल्ये व्यक्तीमत्वाचा अविभाज्य भाग वनविण्यात कुटुंबा बरोबरच मंदिरे, मशिदे, चर्च वगैरे चे योगदान मोठे आहे .

## ४) सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन :

समाजाचे उद्दिष्तये प्राप्त होण्यासाठी समाजातील व्यक्ती व समूह यांच्या वर्तनाचे नियमन व्यभिचार स्वर्गाची व होणे आवश्यक असते .सामाजिक नियमनाना धर्माचा आधार मिळाल्याने व्यक्ती व समूहाचा वराचसा भाग धार्मिक वर्तन बनलेला असतो. उदा. सत्य बोलावे, चोरी करू नये, हिंसा करू नये, करू नये वगैरेचा नियमनाचा धर्मात अम्तर्भाव होतो पण जेव्हा धार्मिक वर्तन व अथार्मिक वर्तन

असा धर्माकडून भेद केला जातो तेव्हा धर्माचरण ईश्वराचा कोप टळून, पुण्यसंचय करून, मोक्षाची प्राप्ती करण्यासाठी सामाजिक नियमनांचे प्रभावी पालन करतात. भूत, प्रेतात्मा, ईश्वराचा कोप, नरकाची भिती या धर्मातील विविध बाबी व्यक्ती व समुहास विशिष्ट वर्तन करण्यास उद्‌युक्त करतात . तेव्हा लोकांच्या वर्तनाचे नियंत्रणास करण्याचे धर्म एक प्रभावी साधन आहे.

## ५) कल्याणकारी कार्याला चालना :

धर्म संस्थेत व्यक्ती व अलौकिक शक्ती यांचे संबंध कसे असावेत यांचे विवेचन केलेले असते.तसेच त्याने इतराशी कसे वागावे या बद्दल मार्गदर्शन केलेले असते. भुतदया, परोपकार क्षमा,शांती वगैरे कितीतरी उदांन्त भावनाचा अविष्कार धर्माकडून केलेला असतो . अशा वागण्यामुळे ईश्वर प्रसन्न होतो असे सांगितल्याने लोक दुस-याला संकटात मदत करतात. दान, धर्म करतात, हिंसेचा त्याग करतात, संघर्षाऐवजी सहकाराची प्रक्रिया स्विकारतात. त्यामुळे त्यांच्यातील समुदाय वाढीस लागते व सेवा भावी वृत्तीने इतरांचे कल्याण करण्याची वृत्ती धर्माकडून जोपासली जाते.

## ६) समाजाला दृढत्व देऊन संघटन टिकवणे :

एमेल डुरखीम या कार्यवादी विचारसरणीच्या मानवशास्त्रज्ञाने ऑस्टेलियातील अरूटा जमातीचा सखोल अभ्यास करून धर्माचे संघटनात्मक कार्य स्पष्ट केले. धर्म ही सामाजिक घटना असून तिचा समाजातील अन्य संस्थाशी संबंध असतो . धर्मातील श्रध्दातून पवित्र 'वस्तुच्या संबंधात

कोणते आचार विधी करावेत व करू नयेत यांचे समूहातील लोकांना प्रभावी मार्गदर्शन होते यामुळे लोकांच्यात समान जीवन मुल्ये रूजून भावनिक एकता निर्माण होते या भावनिक बंधामुळे एकाच धर्मा वर विश्वास ठेवणा-या व्यक्ती परस्परांशी जोडल्या जातात. परिणामी सामाजिक दृढत्व आकाराला येते. समाज स्वास्थाच्या दृष्टिने भावनिक एकता व सामाजिक दृढत्व अत्यंत महत्वाचे असते . समाजाला त्यांच्या विविध गरजा कुटुंब, विवाह, मालमत्ता, अर्थराज्य वगैरे संस्था कडून पार पडला जातो.

## इतर कार्ये :

### १) शिक्षण विषयक कार्ये :

प्राचीन काळापासून नव्या पिढीला ज्ञान देण्याचे कार्य धर्माकडून होत आले आहे . ख्रिश्चनाचे मट, हिंदूची मंदीरे व पाठशाळा, बौध्दांचे मदरसा येथून शिक्षण विषयक कार्ये दीर्घकाळ होत आलेली आहेत.

### २) मनोरंजन :

धर्मातील सण,उत्सव,जत्रा,संगीत,भजन,कथा, किर्तने यामुळे लोकांचे मनोरंजन होऊन त्यांच्या मनाला आनंद शांती देण्याचे कार्य होते.

### ३) आत्मविश्वास :

धर्म मानवाला मानसिक सुरक्षा देतो. त्यामुळे त्याच्या आत्म विश्वासात वाढ होते तो धैर्याने प्रतिकुल परिस्थितीत प्रयत्नवादी राहतो. शिक्षणोपयोगी आहेत यासाठी विशेष सवलती, पुरस्कार दिले जातात. शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते उत्कृष्ट शिक्षकांचा गौरव केला जातो.

**४) प्रतिकात्मक लक्षणे :**

शाळेचा गणवेश,शाळेचे ध्येय वाक्य,प्रार्थना, विद्यापीठाचे चिन्ह वगैरे शिक्षण संस्थाची प्रतिकात्मक लक्षणे आहेत. औपचारिक शिक्षण पध्दतीत या लक्षणांचा मोठया प्रमाणात वापर केला जातो .

**५) उपयुक्त साधने :**

शाळेच्या इमारती ग्रंथालये, पुस्तके, वहया, शास्त्रीय उपकरणे, प्रयोगशाळा, टेलीव्हिजन, टेपरेकॉर्डर, रेडिओ वगैरे उपयुक्त साधनांचा वापर शिक्षण कार्यात वाढत आहे.

**६) आदर्श वा ध्येयांची जपणुक :**

प्रत्येक समाजाचे आदर्श असतात शिक्षण संस्था. त्या आदर्शाची जपणुक करत असते शिक्षणाद्वारे व्यक्तीविकासाची समान संधी सर्वांना उपलब्ध झाली पाहिजे . लोकशाही मुल्यांची जपणुक झाली पाहिजे.राष्ट्रीय मालमत्तेची जोपासना झाली पाहिजे. अशा प्रकारच्या आदर्शाची जपणुक भारतासारख्या लोकशाही देशात शिक्षण संस्थाकडून होताना दिसते.

## क) शिक्षण संस्था (Education)

**प्रस्तावना :**

समाजशास्त्रात शिक्षणाची प्रक्रिया अधिक व्यापक आहे. समाजशास्त्रात शिक्षण म्हणजे दुसरे काही नसून ती समाजीकरणाची प्रक्रिया असते. एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संस्कृतीचे संक्रमण करणे हेच शिक्षणाचे कार्ये असते. म्हणीन शिक्षण म्हणजे असी एक प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती किंवा समूह यांच्या मार्फत एका पिढीकडून संक्रमणाचे कार्य अविरत पणे समाजात चालु असते. किम्बॉल यंग आणि मॅक यांच्या मते समाज ग्रामीण असो वा नागरी असो, लहान असो वा मोठा असो किंवा समाज एक विवाही असो वा बहु विवाही असो समाजरचना साधी किंवा गुंतागुंतीची असो या कोणत्याही समाजात समाजीकरणाचे कार्ये पार पाडण्याची शिक्षणाचे अस्तित्व असते . शिक्षणाच्या व्यवस्थेला पर्याय नसतो. त्यामुळे मानवी समाजातील सार्वत्रिक संस्था म्हणुन शिक्षणाचा विचार करावा लागतो.

शिक्षणास इंग्रजी मध्ये एज्युकेशन (Education ) असे म्हणतात. एज्युकेशन हा शब्द लॅटनि भाषेतील एज्युकेअर या शब्दापासून तयार झाला आहे. आणि या शब्दाचा अर्थ विकसीत करणे,वाढवणे आणि संवर्धन करणे असा आहे . प्रसिध्द ग्रीक तत्वज्ञ प्लेटो यांनी शिक्षणा संबंधी विचार मांडले

आहेत . प्लेटो यांच्या मते "प्रत्येक मानसात काही विशिष्ट प्रमाणात जन्मजात निसर्गदत्त शक्ती असतात त्याना जागृत करून पुर्नत्वास नेणे म्हणजे शिक्षण होय .

## शिक्षणाची व्याख्या :

शिक्षण संबधीच्या काही व्याख्या पुढील प्रमाणे :

**१) बिसांझ आणि बिसांझ :**

"शिक्षण म्हणजे समाजीकरणाची प्रक्रिया होय. ज्या मध्ये व्यक्ती आणि समूह यांच्याकडून संस्कृती घटकांचे संक्रमण दुस-या व्यक्ती व समूह यांच्याकडे होत असते. "

**२) जीन शेपर्ड :**

"शिक्षण संस्था म्हणजे नियमनांची असी व्यवस्था की जी ज्ञानाचे औपचारिक संक्रमण होण्यासाठी वर्तनासंबंधी मार्गदर्शन करते."

**३) ज्युलियस न्युरेरे :** 'शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. "

**४) मागरिट मीड :**

"नवजात बालकाला समाजाचा सभासद बनविण्याचे समाजाकडून होणारे प्रयत्न म्हणजे शिक्षण होय ".

शिक्षणाच्या वरील व्याख्या वरून शिक्षण हे व्यक्तीला घडविण्याचे, त्यांच्यावर संस्कार करण्याचे एक महत्वाचे माध्यम व साधन आहे.

## शिक्षणाचे प्रकार :

शिक्षण कशा प्रकारे दिले जाते ? शिक्षण कोणत्या सामाजिक संस्थाच्या माध्यमातून दिले जाते. या आधारे शिक्षणाचे प्रकार सांगता येतील. जेव्हा शिक्षण घेणा-याला आपण शिकतो आहोत आणि शिक्षण देणा-याला आपण शिकवतो आहोत याची जाणीव नसते तेव्हा त्यास "अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात .पण जेव्हा शिक्षण घेणा-याला आपण शिकवतो आहोत आणि देणा-याला 11 आपण शिकवतो याची जाणीव असते त्यास "औपचारिक शिक्षण " असे म्हणतात. या कसोटयावर शिक्षण संस्थाचे अनौपचारिक आणि औपचारिक असे दोन प्रकार करण्यात आले.

## १) औपचारिक शिक्षण :

शिक्षण देण्याच्या उद्देशाने शाळा, महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. शाळेत वैज्ञानिक पध्दतशीर आणि पुर्व नियोजीत शिक्षण दिले जाते. शाळेत अभ्यासक्रम, वेळापत्रक , अध्ययन

पध्दती, शिक्षक इ. सर्व घटकांची सहेतुक योजना आखलेली असते. म्हणुन शाळेतून दिले जाणारे शिक्षण हे औपचारिक शिक्षण होय आणि औपचारिक शिक्षण देणारी शाळा ही औपचारिक शिक्षण संस्था आहे . विद्यार्थी शाळेत शिकवण्यासाठी जातात. त्याच प्रमाणे शिक्षकांची नियुक्ती शिकवण्यासाठी झालेली असते. शाळेतील इतर कार्ये ही या शैक्षणिक कार्याला आवश्यक पुरक म्हणुनच केली जातात.बदलत्या परिस्थितीनुसार जीवनविषयक गरजा आणि शैक्षणिक गरजा यात वदल झाल्यास त्या अनुषंगाने अभ्यासक्रमात देखील बदल केले जातात. थोडक्यात शाळेची विशिष्ट उद्दिष्टये आहेत त्या उद्दिष्तयानुसार जाणीवपुर्वक नियोजन केले जाते त्याप्रमाणे विद्यार्थांना शिकवण्याचा बुध्दीपुरसर प्रयत्न सुध्दा केला जातो. शाळेतुन दिले जाणारे शिक्षण म्हणजे औपचारिक शिक्षण होय.

## २) अनौपचारिक शिक्षण :

अनौपचारिक शिक्षण हे स्वाभाविक आणि नैसर्गिक असते ते सहजपणे दिले जाते. या मध्ये शिक्षणाचे पुर्व नियोजन नसते. शिक्षण देण्याचा हेतु नसतो. शिक्षण घेणा-याला आपण शिकतो आहोत आणि शिक्षण देणा-याला आपण शिकवतो आहोत याची जाणीव नसते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षक अशा भूमिका नसतात. आई - वडील आपल्या मुलामुलींना अनेक गोष्टी शिकवत.

## शिक्षणाची वैशिष्टये :

शिक्षण संस्थेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे :

### १) सार्वत्रिकता :

समाजीकरणाची प्रक्रिया प्रामुख्याने शिक्षणाशी संबंधित असल्याने आदिवाशीपासून ते प्रगत समाजा पर्यन्त सर्वांनाच शिक्षण संस्थेची आवश्यकता आहे.

### २) निरंतराची प्रक्रिया :

केवळ लहान मुलाला शाळेत किंवा घरात शिक्षण दिले म्हणजे शिक्षणाची प्रक्रिया संपत नाही दिवसेंदिवस ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कक्षा रूंदावत चालल्या आहेत . संस्कृती अधिक विकसीत होत आहे .त्यामूळे जितके शिकावे तितके थोडेच आहे. त्याच प्रमाणे व्यक्तीच्या जन्मापासून मृत्युपर्यंत विविध भूमिका पार पाडण्यासाठी तिला शिक्षण हवेच असते. केवळ नव्या पिढीला शिकवायची असी एक मार्गी वाहतूक मागे पडली असून नव्या पिढीकडून जुन्या पिढीला शिकावे लागत आहे .त्यामुळे

शिक्षण ही निरंतराची प्रक्रिया आहे. मानवी ज्ञानाचा आवाका वाढत आहे समाज व्यवस्थेत परिवर्तन, नवीन मुल्ये रूजत आहेत त्याच्याशी समायोजन साधण्यासाठी शिक्षण हवेच.

**३) शिक्षणोपयोगी अभिवृत्तीची जोपासना :**

वाढत्या ज्ञानाचा व संस्कृतीचा वारसा पुढील पिढीकडे देण्याची शिक्षणाची क्रिया यशस्वी होण्यासाठी आपण शिकले पाहिजे आणि आपण शिकवले पाहिजे या अभिवृत्तीची जोपासना केली जाते . शिकण्याची आवड निर्माण करणे, ज्ञानवृध्दी वाढवणे, अभ्यास करणे या अभिवृत्ती असतात . आपल्या मुलाला शिस्त लागावी, त्याला चांगले वळण लागावे, त्याच्या वर चांगले संस्कार व्हावेत म्हणुन आई वडील आणि कुटुंबातील सदस्य आणि अप्रत्येक्ष शिकवतात म्हणुन कुटुंब ही मुलांची पहिली पाठशाळा असते असे म्हटले जाते. कुटुंब, धर्म, संस्कृती, शासन, दुरचित्रवाणी ,आकाशवाणी, वृत्तपत्रे, वाडमय इ. सर्व अनौपचारिक शिक्षण संस्थाच होत या संस्थातुन मुलावर संस्कार होतात परंतु शिक्षण देणे हा या संस्थांचा मुलभुत उद्देश नसतो या संस्थाची निर्मिती शिक्षण देण्यासाठी झालेली नाही तर अन्य सामाजिक कारणामुळे या सामाजिक संस्था मुलांवर संस्कार करण्याचे कार्या करीत असतात अनौपचारिक शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीला मिळत असते त्यामुळे ती व्यक्ती समाजा मध्ये आपली भूमिका वठवी शकते. अनौपचारिक शिक्षणातून वालमनावर होणारे संस्कार शेवटपर्यंत असतात म्हणुन अनौपचारिक शिक्षणाचे विशेष महात्व आहे.

## शिक्षणाची भूमिका व कार्ये (Role and Functions of Education)-

संस्कृतीचे रक्षण करून सामाजिक प्रगती साध्य करणे हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे कार्य आहे. या संदर्भात सामाजिक तत्त्ववेत्त्यांनी शिक्षण संस्थेच्या कार्याची दोन गटांत विभागणी केली आहे.

**१. शिक्षण संस्थेचे संरक्षणात्मक कार्य :** काही प्रमुख सामाजिक विचारवंतांच्या मते, प्रचलित संस्कृतीचे रक्षण करणे हे शिक्षण संस्थेचे महत्त्वाचे कार्य आहे..

**२. शिक्षण संस्थेचे संवर्धनात्मक कार्य :** शिक्षण संस्थेचे हे कार्य रचनात्मक व विधायक असते. सामाजिक संघटनेच्या मूलतत्त्वानुसार शिक्षण संस्था हे कार्य करीत असतात. सामाजिक प्रगती आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी हे कार्य शिक्षण संस्था करीत असतात. समाजाच्या सद्यःस्थितीचे परीक्षण करून सामाजिक प्रगती साधण्याचे अथवा त्याला प्रोत्साहन देण्याचे कार्य शिक्षण संस्था करीत असतात. तसेच प्रगतीपर समाजाची रूपरेषा आखण्याचे प्रयत्न केले जातात.

अशा प्रकारे समाज व शिक्षण संस्था यामध्ये घनिष्ठ संबंध असून त्यातील परस्परपूरकता समाजाच्या सर्वांगीण विकासांसाठी आवश्यक आहे आणि त्यासाठी शिक्षण संस्थेचे सहकार्य घेतले जाते. साहजिकच शिक्षण संस्था हे सामाजिक जीवनाचे व सामाजिक संघटनांचे एक केंद्र बनते.

शिक्षणाद्वारे समाजाच्या व व्यक्तीच्या विशिष्ट स्वरूपाच्या गरजा पूर्ण केल्या जातात. व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ उद्दिष्टे पूर्ण करण्याचे कार्य शिक्षण संस्थांना करावे लागते. तसेच मानवी गरजांची पूर्ती करणे हे शिक्षण संस्थेचे मुख्य कार्य मानले जाते.

या उद्दिष्टपूर्तीसाठी सामाजिक संस्था या नात्याने शिक्षण संस्थेला काही प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे पार पाडावी लागतात.

**१. व्यक्तिव्यवहार सुलभता :** व्यक्तीने एकनिष्ठ कसे राहावे व ते ध्येय कसे गाठावे याचा मार्ग शिक्षण संस्था दाखविते. लोकशाही समाजरचनेत प्रत्येक व्यक्तीचे स्थान व मूल्य अबाधित ठेवण्यासाठी, प्रत्येकाला स्वावलंबी होण्यासाठी, तसेच राष्ट्रीयत्वाची जाणीव मनात निर्माण करण्यासाठी शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका बजावते. तसेच सामाजिक वारसा जपण्याचे कार्य आणि व्यक्तीला त्या अनुरोधाने विकसित करण्याचे कार्य, व्यक्तीला अनुकूल बनविण्याचे कार्य शिक्षण संस्था करीत असते.

**२. व्यक्तिव्यवहारांचे नियमन करणे :** सामाजिक स्थैर्य व समाजात पुरोगामित्व निर्माण करण्यासाठी शिक्षण संस्थेने नव्या सामाजिक मूल्याची व सामाजिक जीवन प्रकारांची निर्मिती करणे आवश्यक असते. तसेच त्यांचा विकास साधणे, करमणूक, व्यवसाय, जीवनपद्धती इत्यादी बाबतीत नवीन वांछनीय मूल्ये निर्माण करण्याचे कार्य शिक्षण संस्थांना पार पाडावे लागते. तसेच या सर्व क्षेत्रांत नवनिर्मिती करणे महत्त्वाचे असते. या दृष्टीने व्यक्ती ही केंद्र मानून व्यक्तिव्यवहारांचे नियमन करणे गरजेचे असते. आरोग्य,

**३. दर्जा व भूमिकात्मक कार्य :** वर उल्लेखिलेल्या मूल्यविकासाच्या दृष्टीने शिक्षण संस्थेचे कार्य हे सृजनात्मक व विधायक स्वरूपाचे असे असले पाहिजे. यासाठी व्यक्तीच्या आचरणात लवचीकता असावी लागते. तसेच सामाजिक बदलांनुसार शिक्षणक्रम तयार करणे आवश्यक असते. कोठारी कमिशनने सूचित केलेली कार्ये या दृष्टीने महत्त्वाची आहेत. ही कार्ये अशी आहेत (अ) व्यक्तीची उत्पादनक्षमता वाढविणे (ब) नव्या वृत्ती जोपासून त्यातून सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य साधणे (क) आधुनिकीकरणाला गती देणे (ड) सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करणे. यामुळे व्यक्तीला समाजात एक दर्जा प्राप्त होतो तसेच स्वतंत्र अशी भूमिका व्यक्तीला पार पाडता येते.

**४. समाजीकरणाचे कार्य करणे :** जन्मापासूनच बालकाच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य असा आकार देण्याचे कार्य शिक्षण संस्थेला करावयाचे असते. आधुनिक काळात मुलाला दिले जाणारे शिक्षण म्हणजे परिसरातील घटकांशी समायोजन करण्यास शिकविणे हे असते. त्याच्या शक्तींना योग्य वळण देणे, त्याच्या अंगभूत शक्तीचे योग्य विकसन व व्यवस्थापन करणे, त्याच्या क्षमतांचा योग्य तो उपयोग

करणे महत्त्वाचे असते. त्या दृष्टीने शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते. व्यक्तीमध्ये सामाजिक जीवन जगण्याची क्षमता निर्माण करणे, समाजाचा एक पूर्ण व जबाबदार घटक म्हणून व्यक्तीला विकसित करणे हे महत्त्वाचे कार्य शिक्षण संस्था पार पाडतात. कुटुंबानंतर समाजीकरणाचे महत्त्वाचे कार्य करणारी महत्वाची संस्था म्हणून शिक्षण संस्थेकडे पाहिले जाते. समाज आणि संस्कृती याविषयीचे ज्ञान मुलांना समाजीकरणामार्फत दिले जाते. रूढी, परंपरा, समाजमान्य वर्तनप्रकार, उत्पादन प्रक्रिया याविषयीचे ज्ञान दिले जाते. औपचारिक पद्धतीने शिक्षण देऊन व्यक्तीला जीवन जगण्यासाठी पूरक अशा स्वरूपाचे संस्कृतीचे ज्ञान करून दिले जाते. शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांना समाजाच्या संस्कृतीच्या विशेष भागांचे ज्ञान दिले जाते व त्यांचे समाजीकरण पूर्ण केले जाते.

**५) संस्कृती संक्रमण :** पूर्वापार चालत आलेला समाजाचा सांस्कृतिक वारसा पिढीपर्यंत पोहोचविणे हे शिक्षणाचे व पर्यायाने शैक्षणिक संस्थेचे एक महत्त्वाचे ५. • कार्य असते. या पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीचे ज्ञान व्यक्तीला अनेक प्रकारे पुढच्या • उपयोगी पडते. वर्तमानकालीन घटनांचे स्वरूप लक्षात येण्यासाठी भूतकालीन गोष्टींचे तितकेच आवश्यक असते आणि ते प्राप्त करून देण्याचे कार्य शैक्षणिक संस्था करीत असते. प्रत्येक पिढी पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीच्या ज्ञानाच्या आधारेच ज्ञान कवीन सांस्कृतिक गोष्टी निर्माण करू शकते. समाजाच्या संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवून समाजाच्या संस्कृतीचे सातत्य टिकविणे हे महत्त्वाचे कार्य ही संस्था पार पाडते.

**६. ज्ञान संपादनाची साधने प्राप्त करून देणे :** ज्ञान संपादन करण्याचे एक साधन म्हणजे प्रत्यक्ष अनुभव होय. परंतु, व्यक्तीला सर्वच गोष्टींचा अनुभव मिळणे शक्य नसते. त्यामुळे व्यक्तीला ज्ञान संपादनाचे इतर मार्ग उपलब्ध करून देणे हे शिक्षणाचे एक कार्य आहे. लेखनकला व वाचनकला हे ज्ञान संपादनाचे प्रमुख मार्ग आहेत. त्यामुळे त्यांचा शिक्षणामध्ये समावेश करण्यात येतो. याशिवाय व्यक्तीला ज्ञान संपादन करण्यासाठी निरनिराळ्या विषयांच्या अध्ययनामध्ये निरनिराळी चिन्हे, विश्लेषण, प्रयोगपद्धती, सूत्रे आयोजिली जातात. त्यांचीही माहिती असणे आवश्यक असते. त्यांच्या साहाय्याने व्यक्ती त्या विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेऊ शकते. त्यामुळे व्यक्तीला अशा साधनांचे ज्ञान करून देणे हे शिक्षणाचे एक प्रमुख कार्य आहे.

**७. शास्त्रीय दृष्टिकोणाची वाढ व ज्ञानलालसा :** व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे हे शिक्षणाचे एक कार्य असते. व्यक्तीच्या ठिकाणी सभोवतालच्या गोष्टींचा व घडामोडींचा पूर्वग्रहविरहित दृष्टिकोणातून अभ्यास करून त्यातील सत्य शोधून काढण्याची वृत्ती निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाद्वारे केले जाते. व्यक्तीच्या मनातील पूर्वग्रहांचे निराकरण करून तिला त्या गोष्टींसंबंधी सत्य परिस्थितीचे दर्शन घडविणे हे शिक्षणाचे कार्य असते. शिक्षणाद्वारेच व्यक्तीला निरनिराळ्या गोष्टींसंबंधीचे वास्तव ज्ञान प्राप्त होते व तिचे पूर्वग्रह नष्ट होतात.

"समाजाची बौद्धिक पातळी वाढविणे, व्यक्तीला आपल्या मताबद्दल व निष्कर्षाबद्दल जागरूक दृष्टिकोण स्वीकारायला लावणे, वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करण्याची सवय लावणे" हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य असते असे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ न्यूमन यांनी म्हटले आहे. व्यक्तीमध्ये

बुद्धिनिष्ठ दृष्टिकोण व विवेकनिष्ठा निर्माण करणे, तिच्या चिकित्सक वृत्तीची वाढ करणे व तिचे अज्ञान, अंधश्रद्धा नष्ट करणे हेही शिक्षणाचे कार्य आहे. तसेच व्यक्तीच्या मनात ज्ञानलालसा निर्माण करणे यासाठीही शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीला तिच्या भोवतालच्या गोष्टींसंबंधीची सत्य माहिती किंवा ज्ञान दिले जाते. अर्थात, केवळ ज्ञान देणे हा शिक्षणाचा हेतू असत नाही तर या ज्ञानाच्या आधारे व्यक्तीच्या मनात त्या गोष्टींसंबंधी अधिक उत्सुकता निर्माण करण्याचे कार्यही शिक्षणाद्वारे केले जाते.

**८. व्यक्तीच्या अंगभूत गुणांचा विकास व चारित्र्याची जडणघडण करणे :** व्यक्तीमध्ये असलेल्या अनेक सुप्त गुणाना व शक्तींना व्यक्त स्वरूप प्राप्त करून त्यांचा विकास घडवून आणण्यास मदत करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. व्यक्तीच्या बुद्धिमत्तेला चालना देणे तसेच कल्पकतेला उत्तेजन देण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. चरितार्थासाठी तांत्रिक शिक्षण देणे आणि समाजाचा जबाबदार घटक म्हणून व्यक्तीच्या ठिकाणी चांगले चारित्र्य निर्माण करणे ही भूमिकाही शिक्षणाला पार पाडावी लागते. त्यामुळे शिक्षणातील उदार दृष्टिकोण महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व चांगले घडविणे, व्यक्तीला चारित्र्यसंपन्न बनविणे, तिच्या अंगी सामाजिक गुणांची जोपासना करणे हाही शिक्षणाचा हेतू असतो. तसेच उच्च सामाजिक मूल्यांची जोपासना करणे, नैतिक गुणधर्म विकसित करणे या सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींचाही पाठपुरावा शिक्षणालाच करावा लागतो. व्यक्तीच्या अभिरुचीला योग्य वळण लावण्याचे कार्य शिक्षणालाच करावे लागते. व्यक्तीच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करून समाजाची धारणा अबाधित ठेवण्याचे कार्य शिक्षण संस्थांना करावे लागते. तसेच मानवतावादी दृष्टिकोण व्यक्तीच्या मनात निर्माण करण्याची जबाबदारी आधुनिक काळात शिक्षण संस्थांनाच पार पाडावी लागते.

**९. सामाजिक परिवर्तन घडवून आणणे :** सामाजिक परिवर्तनातील सर्वांत प्रभावी आणि मूलगामी घटक म्हणून शिक्षणाचा विचार केला जातो. सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे. व्यक्तीच्या आचारविचारात योग्य ते बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला नवीन दृष्टिकोण प्राप्त होतो. तसेच त्यामुळे समाजरचना व संस्कृतीतील उणिवांची जाणीव होते, दोषांची कल्पना येते आणि त्यांचे निराकरण कसे करावयाचे याचेही ज्ञान होते. त्यामुळे एकाच वेळी शिक्षण हे संस्कृती रक्षकाची तसेच संस्कृतीत बदल घडवून आणणाऱ्या घटकाची भूमिका बजावीत असते. तसेच प्रचलित समाजव्यवस्थेला धक्का देण्याचे सामर्थ्य शिक्षण संस्थेत असते. सामाजिक संस्थांत योग्य ते बदल घडवून कार्य शिक्षण संस्था करीत असते व त्यासाठी विशिष्ट प्रक्रियेचा अवलंब करीत असते. पुरोगामी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी शिक्षण संस्थेलाच पुढाकार घ्यावा लागतो.

## ड) विवाह संस्था (Marriage Institution)

**स्वरूप आणि व्याख्या –**

माणसाच्या मूलभूत सहज प्रवृत्तींपैकी कामप्रवृत्ती ही एक नैसर्गिक सहजप्रवृत्ती आहे. तसेच ती शारीरिक गरज असल्याने तिची योग्य प्रकारे पूर्तता होणे आवश्यक असते. सामाजिक जीवनास आवश्यक ठरणाऱ्या गरजांच्या पूर्ततेसाठी विविधांगी व्यक्तिवर्तनावर सहेतुक नियंत्रण प्रस्थापित करणे, हे निरनिराळ्या सामाजिक संस्थाचे एक मूलभूत कार्य असते. मानवाच्या लैंगिक गरजांच्या पूर्ततेसाठी, म्हणूनच प्रत्येक समाजात विशिष्ट नियम आणि प्रथा प्रचलित झालेल्या असतात. कारण इतर गरजांप्रमाणे लैंगिक गरजांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छाचार व अनियंत्रितपणा सामाजिकदृष्ट्या विघातक असतो. याचा अर्थ समाजातील स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंध नियमित करणे केवळ इष्टच नव्हे तर आवश्यक असले तरी, स्त्री-पुरुषांमधील लैंगिक वर्तनाचे नियमन करणारी एक संस्था एवढाच विवाहाचा मर्यादित अर्थ होत नाही. तसेच कामतृप्तीचा मार्ग मोकळा करणे हाच केवळ विवाहामागील प्रमुख हेतू नसतो किंवा केवळ लैंगिक समाधान प्राप्त करून घेणे एवढाच विवाहाचा एकमेव हेतू नाही. म्हणजेच

लैंगिक समाधान व विवाह या दोन गोष्टी भिन्न आहेत. त्यामुळे विवाहाची आवश्यकता, विवाहामागचा सामाजिक हेतू लक्षात घेणे आवश्यक आहे.

मानवातील कामप्रवृत्ती ही सार्वत्रिक व कायमस्वरूपाची असते. मानवसमाज या सहजप्रवृत्तींवर सामाजिक हिताच्या दृष्टीने नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो. कारण समाजातील सदस्यांचे नियंत्रित लैंगिक वर्तनच समाजस्वास्थ्यास पोषक ठरते. म्हणूनच समाज लोकांच्या लैंगिक वर्तनाकडे विशिष्ट दृष्टिकोणातून पाहतो. समाजातील सदस्यांचे लैंगिक वर्तन ही केवळ त्यांची खाजगी शारीरिक बाब नसून त्याला एक प्रकारचे सामाजिक व नैतिक अधिष्ठान आहे अशी समाजाची धारणा असते. त्यामुळे समाज लोकांच्या लैंगिक वर्तनप्रकारांची प्रतवारी लावून त्यात योग्यायोग्य ठरवीत असतो. विवाहात केवळ लैंगिक संबंधच अभिप्रेत नसून, या संबंधांबरोबरच येणाऱ्या जबाबदाऱ्यांचाही त्यात समावेश होतो. विवाहामुळे निर्माण झालेले स्त्री-पुरुष संबंध कायमस्वरूपाचे असतात आणि या संबंधांबरोबरच संबंधित व्यक्तींना अपत्यनिर्मिती, अपत्य संगोपन व संवर्धन यांसारख्या विवाहोत्तर येणाऱ्या कौटुंबिक जबाबदाऱ्या अपरिहार्यपणे स्वीकाराव्या लागतात. तसेच लैंगिक संबंधाच्या परिणामांची जबाबदारी स्त्री-पुरुष उभयतांनी उचलली पाहिजे. अशा स्त्री-पुरुष संबंधातून निर्माण होणाऱ्या संततीचा पुरुषाशी असलेला संबंध स्पष्ट करून त्या संततीला कुटुंबात आणि समाजात निश्चित स्थान मिळाले पाहिजे. या हेतूने स्त्री-पुरुषांचे संबंध स्थिर करणारी व संततीला कायदेशीर स्थान देणारी यंत्रणा मानवी समाजात विकास पावलेली आढळते. या यंत्रणेलाच आपण विवाह संस्था असे म्हणतो. या संदर्भात ब्रेडमायर व स्टीफनसन् या समाजशास्त्रज्ञांनी केलेली विवाह संस्थेची व्याख्या उद्‌बोधक आहे. ते म्हणतात, “विवाह संस्था ही केवळ स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंध नियंत्रित करणारी संस्था नसून ती प्रामुख्याने प्रजोत्पत्तीला कायदेशीर स्वरूप देणारी संस्था आहे.”

स्थूलमानाने, विवाह म्हणजे दोन अथवा अधिक स्त्री-पुरुषांमधील दीर्घकालीन स्वरूपाचा समाजमान्य असा संबंध असतो. त्या संबंधात भाग घेणाऱ्या भागीदारांना अपत्य संगोपन व संवर्धन अशा स्वरूपाच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात आणि त्या सर्वांच्या परस्परसंबंधात काही हक्क आणि कर्तव्ये निर्माण होतात.

विवाहाच्या विविध प्रकारच्या व्याख्या निरनिराळ्या समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या असून त्या विवाहाच्या कोणत्या ना कोणत्यातरी वैशिष्ट्यांवर भर देणाऱ्या आहेत.

या व्याख्या पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतात.

### १. एडवर्ड वेस्टरमार्क (History of Human Marriage या ग्रंथातील व्याख्या)

"प्रथा अथवा कायदा यांची मान्यता असलेला, एक अथवा अधिक पुरुष किंवा एक अथवा अधिक स्त्रिया यांच्यातील संबंध म्हणजे विवाह होय. या संबंधात भाग घेणाऱ्या भागीदाराला परस्परांविषयी व त्या भागीदारीतून निर्माण झालेल्या मुलांविषयी काही हक्क व कर्तव्ये असतात.

("Marriage may be defined as a relation of one or more men to one or more women which is recognized by custom or law and involves certain rights and duties both in the case of the parties entering the union and in the case of the children born of it”)

**२. रॉबर्ट लोई (Social Organisation या ग्रंथातील व्याख्या)**

"कोणत्याही समाजात स्त्री-पुरुष समागमाचा सर्वाधिक मान्यता असलेला प्रकार म्हणजे विवाह होय.'

("The forms of mating enjoying the highest approbation constitute 'marriage' in a given society")

**३. ई. ए. होबेल (The Primitive World या ग्रंथातील व्याख्या)**

“समागम करणाऱ्या जोडींचे परस्पराशी, त्यांच्या आप्तसंबंधितांशी, त्यांच्या अपत्यांशी व अखिल समाजाशी असलेले संबंध स्पष्ट व नियंत्रित करणाऱ्या सामाजिक मूल्याचे संमिश्रण म्हणजे विवाह होय.

("Marriage is the complex of social norms that define and control the relations of a mated pair to each other, their kinsmen, their offspring and society at large")

**४. सम्नर व केल्लर : (The Science of Society या ग्रंथातील व्याख्या)**

“विशिष्ट काळी समूहाने घालून दिलेल्या लोकनीतीच्या मर्यादा आणि पद्धती यांच्यानुसार जीवन जगण्यासाठी प्रयत्न करणे व प्रजोत्पादन करणे या सर्वकाळी मानली गेलेली स्त्री-पुरुषांची विवाह ही एक संघटना आहे."

वरील व्याख्यांचा परामर्श घेतल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, विवाह हा एक किंवा अधिक स्त्री-पुरुषांचा एक संघ आहे. भागीदारांचे परस्परांविषयी व अपत्यांविषयी असलेले हक्क व कर्तव्ये यांचा त्यात समावेश होतो. लैंगिक समाधान हा जीवशास्त्रीय घटक त्यामध्ये जरी प्रभावी असला तरी संतती संगोपन करून कुटुंब सातत्य टिकविणे हे समाजशास्त्रीय कार्यदेखील तितकेच महत्वाचे आहे. म्हणून विवाह हा केवळ स्त्री- पुरुषांचा संघ असत नाही तर त्याला सामाजिक, धार्मिक विधीच्या स्वरूपात मान्यता मिळालेली असते. त्यामुळे त्यातील भागीदारांना परस्परांशी लैंगिक, सामाजिक व आर्थिक संबंध ठेवण्याविषयी काही अधिकार प्राप्त होतात.

स्त्री-पुरुषातील लैंगिक संबंध हा विवाहाचा मूलाधार आहे. या संबंधांना समाज मान्यता प्राप्त झाल्यानंतरच विवाह संस्थेची निर्मिती होते. जगातील प्रत्येक समाजात स्त्री-पुरुषातील लैंगिक संबंधावर कोणत्या ना कोणत्या प्रकारे नियंत्रणे घातलेली आढळतात. विवाह कोणत्याही पद्धतीने झालेला असो, त्याला समाजमान्यतेची अथवा

## विवाहाची कार्ये (Functions of Marriage)

विवाहाची पुढील स्वरूपाची कार्ये महत्त्वाची मानली जातात.

**१. लैंगिक संबंधांचे नियंत्रण करणे :**

व्यक्तीने कोणाशी, केव्हा व कशा रीतीने लैंगिक संबंध प्रस्थापित करावेत. यासंबंधी समाजाची काही बंधने असतात व समाजातील लोकांना ती बंधनकारक असतात. कौटुंबिक जीवनाचा पर्यायाने समाजजीवनाचा पायाच ढासळू नये यासाठी समाजाने ही बंधने घातलेली असतात. मानवी समाजातील लैंगिक संबंधांचे योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक, सामाजिक-असामाजिक असे वर्गीकरण केलेले असते आणि त्यातील भेदभाव विवाह संस्थेच्या रूपाने लोकांच्या लक्षात आणून दिले जातात. अशा नियमांचे पालन करण्याविषयी समाजात दक्षता बाळगली जाते. मानवी समाजातून विवाह संस्था जर काढून टाकली तर समाजजीवनात कमालीचा गोंधळ माजेल. म्हणून व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या लैंगिक संबंधाचे नियमन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विवाह संस्था करीत असते.

**२. वंशपरंपरा निश्चित करणे :**

व्यक्तींची वंशपरंपरा निश्चित करणे विवाहामुळेच शक्य होते. दोन किंवा त्यापेक्षा अधिक भिन्नलिंगी व्यक्तींचा विवाह होऊन कुटुंब निर्माण होते. अशा कुटुंबात जन्माला येणारी मुले त्या कुटुंबाच्या कुळाचे वंशज मानली जातात. त्यामुळे माता-पिता यांच्या समाजातील दर्जावरून मुलांचेही स्थान निश्चित केले जाते. आई-वडिलांचे ज्यांच्याशी आप्तसंबंध असतात त्यांच्याशी त्या मुलांचे संबंध स्थापन होतात. या व्यवस्थेमुळेच कुटुंबात जन्माला आलेले मूल त्या समाजात सामावून घेतले जाते.

**३. उत्तराधिकारी ठरविणे :**

मालमत्तेचा उत्तराधिकार व सामाजिक स्थानाचाउत्तराधिकार यांचे नियमन करणे हे विवाहाचे प्रमुख कार्य मानले जाते. प्रत्येक स व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची स्थावर व जंगम मालमत्ता कोणाला द्यावी असा प्रश्न उद्भवतो. विवाहामुळे हा प्रश्न सोडविणे सोपे जाते. वंशसातत्य टिकविणे ही मानवाची एक नैसर्गिक प्रवृत्ती असते. आपल्या पोटी जन्माला आलेल्या मुलांनाच आपल्या मालमत्तेचा दो उत्तराधिकारी नेमत असतो. इतरांना तो ते अधिकार देत नाही. म्हणूनच वैवाहिक जीवन मूल न झाल्यास तो दत्तक घेतो व अशा दत्तक मुलाला तो आपल्या संपत्तीचा उत्तराधिकारी नेमत असतो.
समाजात

**४. सामाजिक संबंध व्यापक करणे :**

विवाहामुळे सामाजिक संबंधांची व्याप्ती वाढते. विवाहामुळे केवळ दोन व्यक्ती एकत्र येत नसतात तर दोन कुटुंबे, दोन समूह परस्परांजवळ येत असतात व त्यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध निर्माण होऊन त्यांच्यातील आत्मीयतेची भावना वाढीस लागण्यास मदत होते. विवाहामुळे चिरस्थायी स्वरूपाचे संबंध स्थापन होत असल्याने ते संबंध चांगले असतील याचीही दक्षता घेतली जाते.

**५. एकत्वाची भावना वाढविणे :**

विवाहामुळे पती-पत्नींमध्ये एकत्वाची भावना निर्माण होऊन कालांतराने त्यांच्या मानसिक व ध्येयवादी जीवनातदेखील समानता निर्माण होते. पती-पत्नी संबंधामुळे कित्येकदा जवळच्या नातेवाइकांतदेखील घनिष्ठ संबंध प्रस्थापित होऊन त्यांच्यात ममत्वाची भावना निर्माण होते. तेव्हा पती-पत्नीबरोबरच संबंधित सर्व लोकांत एकत्वाची व आपलेपणाची भावना वाढीस लावणे हे महत्वाचे कार्य विवाह संस्था करते.

**६. मुलांचे पालनपोषण करणे :**

विवाहामुळे मुलांच्या पालनपोषणासाठी निश्चि अशी परिस्थिती निर्माण होते. विवाहामुळे दोन भिन्नलिंगी व्यक्तींचा एक संघ तयार होतो. या संघाला समाजाची मान्यता असते. तसेच प्रजोत्पादन, संतती-संगोपन या जबाबदाऱ्याही या संघाला स्वीकाराव्या लागतात. त्यामुळे विवाह संबंधांपासून जन्मलेल्या मुलांच्या पालनपोषणाची व्यवस्था निर्माण होते व स्वतःच्या पायावर उभे राहीपर्यंत ती मुल त्या कुटुंबात राहू शकतात